ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625 (UIF) Volume - 6 | Issue - 3 | April - 2016

Indian Streams Research Journal

# मराठवाडयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आत्महत्याः एक भौगोलिक अभ्यास

**एस.जे.आवटे**
विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक , भूगोल विभाग, वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

**सारांशः**

*महाराष्ट्राच्या मध्यवर्ती भागातील स्थान लाभलेला मराठवाडा हा आठ जिल्हयाच्या समुदायाचा प्रदेश जेथे सरासरी पर्जन्य अतिशय कमी त्यामुळे येथे प्रति पाच वर्षातून ३ वेळा दुष्काळी स्थिती निर्माण झालेली असते. परंतु २०१४-१५ या वर्षी हा दुष्काळ सलग आल्याने या वर्षी पावसाचे प्रमाण एकदम कमी झाले आहे. त्यामुळे येथील शेतकरी अडचणीत आला. यामध्ये जमीनधारणा क्षेत्र कमी असलेल्या ८४ टक्के शेतकऱ्यांनी (पाच एकरापर्यंत शेती) आत्महत्या केल्या आहेत. मराठवाडयातील या आत्महत्येचे कारण शोधताना असे दिसून येते की, कमी शेती (एक ते पाच एकर पर्यंत शेती) असलेल्या शेतकऱ्यांनी शेतात जास्त गुंतवणूक करुन पिकाची शाश्वती मिळवण्याचा प्रयत्न करतो. ही शेतकरी पूर्णपणे शेतीवरच अवलंबून होते. या शेतकऱ्याला जादा जमीन नसल्याने त्याची पूर्ण मदार या उपलब्ध लहान क्षेत्रावर असते. त्यामुळे मराठवाडयातील एकूण २०१४-१५ या वर्षी ११०८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यापैकी ९३० शेतकरी हे अल्पभूधारक आहेत. जास्त क्षेत्र असलेल्या क्षेत्रातील शेतकऱ्यांनी आत्महत्या कमी केल्याचे दिसून येते. १५ एकर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्र असलेले ५ टक्के एवढेच शेतकरी आत्महत्या केलेले आहेत.*

**बीजसंज्ञाः** अल्पभूधारक, आत्महत्या, जीवनयात्रा



**प्रस्तावनाः**


२०१५ मध्ये सुरु झालेले महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे आत्महत्येचे सत्र २०१६ मध्येही सुरुच राहीलेले दिसते. एकटया मराठवाडयात २०१५ मध्ये ११०८ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवली. पाऊस पुढे पडेल, जीवन पुन्हा येणार नाही. याचा साधा विचार न करता शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग का स्विकारावा याचे उत्तर शोधताना अनेक गोष्टी समोर आल्या. शेतीचा प्रति हेक्टरी उत्पादन खर्च पूर्वीपेक्षा १० पट वाढला. त्यामध्ये आधुनिक बियाणे प्रचंड महाग झाले आहेत. त्याच बरोबर रासायनिक खते, किटकनाशके, मशागतीचा ट्रॅक्टर ते केलेला खर्च ही उत्पादन येवू अथवा न येवो. पायाभूत खर्च प्रति हेक्टरी या शेतकऱ्यांना वेळेतच करावा लागतो. पुन्हा पाऊस, पाणी या गोष्टीचा त्यामध्ये मराठवाडयातील सर्वच जिल्हयात समान आत्महत्या झाल्या नाहीत, तर बीड जिल्हयात २० टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्याचवेळी हिंगोली जिल्हयात फक्त ३ टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्याची अनेक कारणे आहेत परंतु मोठे जमीनदार शेतकरी वर्ग व ५ एकरपेक्षा कमी क्षेत्र असणारे अल्प भूधारक यामध्ये या कमी क्षेत्र असलेल्या ८४ टक्के शेतकऱ्यांनी मराठवाडयात आत्महत्या केल्या. याचा अर्थ हे शेतकरी पूर्णपणे शेतीवर अवलंबून असतात त्यांना जगण्याचा दुसरा मार्ग नव्हताच असे हे शेतकरी आत्महत्येत आघाडीवर आहेत असे दिसून येते. १५ एकरापेक्षा जास्त शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण ५ टक्के एवढे आहे. कारण हे शेतकरी जमिनीचा अर्धाभाग वाया गेला तर दुसऱ्या उरलेल्या जमिनीत दुसरे पीक घेऊ शकतात व परीस्थितीवर मात करु शकतात म्हणून त्याने आत्महत्या प्रमाण कमी आहे.

**अभ्यासक्षेत्र :**

महाराष्ट्राच्या मध्यवर्ती गोदावरी नदीच्या खोऱ्यातील हे आठ जिल्हे या अभ्यासासाठी निवडले. पूर्वेला विदर्भ, पश्चिमेला पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हे, उत्तरेला खानदेश, दक्षिणेला कर्नाटक व आंध्रप्रदेशातील काही जिल्हे या दरम्यान हे क्षेत्र असून येथील सरासरी पर्जन्य ५० ते १५० सेंमी पर्जन्य आहे. याचा अक्षांश विस्तार १७°३५' उत्तर ते २०°४१' उत्तर दरम्यान तर रेखांश विस्तार ७०°४०' पूर्व ते ७८°१६' पूर्व रेखांश दरम्यान असलेले हे क्षेत्र अभ्यासासाठी निवडले आहे. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या २१.०१ टक्के लोकसंख्या व ६४६६३ चौ.किमी क्षेत्रफळ आहे.

**नकाशा क्रं : १**

**मराठवाडयाचे भौगोलिक स्थान**




**उदिष्टये:**

मराठवाडयातील सर्व शेतकरी आत्महत्या करीत नाहीत तर एका विशिष्ट जमीन धारण क्षेत्रातील शेतकरी आत्महत्या का करतात याची कारणे शोधून त्यावर उपाय सूचविणे.

**माहितीस्त्रोत व संशोधन पध्दती:**

सदर शोध निबंधासाठी आवश्यक असणारी माहीती व आकडेवारी दुय्यम प्रकारच्या स्त्रोतातून घेतली आहे. यासाठी महाराष्ट्र, प्रकाशित साहीत्य , दैनिक वर्तमानपत्र , सकाळ, दास्ताने प्रकाशन महाराष्ट्र इ. चा वापर केलाआहे, त्याकरीता नकाशे, आलेखांचे विश्लेषण केले आहे.

**विश्लेषण:**

आत्महत्या मग ती कोणतीही असो वाईटच. ही आत्महत्या जेंव्हा केली जाते तेंव्हा मानसिकतेची आत्महत्या करण्याचा प्रयत्न अनेक वेळा मनात येवून गेलेला असते. कोणतीही व्यक्ती लगेच आत्महत्या करत नाही तर शेवटचा पर्याय म्हणून ती आत्महत्या करते. मराठवाडयातील शेतकऱ्यांची आत्महत्या असाच चिंतेचा विषय बनला आहे. गत वर्षात येथे ११०८ शेतकऱ्यांनी आपली जिवन यात्रा संपवली आहे. त्यामध्ये बीड जिल्हयात सर्वाधिक आत्महत्या केल्याची नोंद आहे. तर हिंगोली येथे सर्वात कमी आत्महत्या केल्याची नोंद आहे. अभ्यास केला असता खालील चित्र दिसून आले.

बरेच शेतकरी अल्पभूधारक असल्याने त्यांना त्याच जमिनीशी निगडीत जीवन चरीतार्थाचे वेळापत्रक तयार करावे लागले. परंतू कमी जमीन ही मोठी समस्या या आत्महत्या करण्यामागे दिसत आहे.

**तक्ता क्रं-१**
**एकरनिहाय शेती आणि आत्महत्या केलेले शेतकरी**

| अ.नं. | जमीन | शेतकरी | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ० ते १ | १६६ | १५ |
| २ | १ ते १.५ | १२२ | १२ |
| ३ | १.५ ते २.५ | ३१० | २८ |
| ४ | २.५ ते ५.० | ३३२ | ३० |
| ५ | ५ ते ७.५ | १११ | १० |
| ६ | ७.५ ते १० | २२ | २ |
| ७ | १० ते १२.५ | २२ | २ |
| ८ | १२.५ ते १५ | ६ | ०.५ |
| ९ | १५ ते १७.५ | ६ | ०.५ |
| १० | १७.५ पेक्षा जास्त | ११ | १ |
| | एकूण | ११०८ | १०० |

*संदर्भ: वृत्तमान पत्र*

वरील आकडेवारीकडे पाहीले असता असे दिसून येते की १ ते ५ एकर जमिन असणाऱ्या ८४ टक्के शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. हे वैशिष्टय मानावे लागेल या विभागात ९३० शेतकरी आत्महत्या केलेले आहेत तर उर्वरीत १६ टक्के शेतकरी हे ५ ते १७.५ एकर क्षेत्रातून आत्महत्या केलेले आहेत असे दिसून येते.

### ० ते ५ एकर शेती:

या गटात शेतकऱ्यांची आत्महत्या करणारी संख्या जास्त आहे ती ८४ टक्के आहे. यामध्ये २.५ ते ५ एकर या गटात सर्वाधिक केलेल्या आहेत हे प्रमाण ३० टक्के एवढे (३३२ शेतकरी ) एवढे आहे. याचा अर्थ या गटात मराठवाडयातील बहुतेक जास्त शेतकरी समाविष्ट होतो. याचे प्रमाण जास्त आहे. १ ते १.५ एकर जमिन असेलेले शेतकरी तुलनात्मक दृष्टया कमी आहेत. त्याचे प्रमाण २६ टक्के एवढे आहे. १.५ ते २.५ या गटातसुध्दा मराठवाडयात २८ टक्के शेतकऱ्यांनी (३१० शेतकरी) आत्महत्या केलेल्या आहेत. या शेतकऱ्यांचे आत्महत्यकडे वळण्याचे कारण म्हणजे जमीन तोकडी, तीही पिकत नाही त्यासाठी खर्च मोठे म्हणून येथे हे प्रमाण जास्त आहे. या गटातील शेतकरी कृत्रीम जलसिंचनासाठी ५ एकरापर्यंत खर्च करतो, त्यासाठी विहीर, पाईपलाइन, अवजारे, बागाची लागवड या वरील शासनाचे कर्ज मिळते. अल्पभूधारक शेतकऱ्याला शासनाचा लाभ मिळत असला तरी तो वेळेवर मिळत नाही, तो अतिशय कमी मिळतो. म्हणजेच या कर्जाचे व्याजच निघत नाही त्यामुळे हे शेतकरी आत्महत्येकडे वळलेले आहेत. १ ते १.५ एकर या गटातील शेतकरी क्षेत्र लहान असल्याने त्यांना मोठा खर्च करावा लागत नाही, त्यांना तारण कर्ज मिळत नाही त्यामुळे ते मोठे भांडवली खर्च करत नाहीत त्यामुळे त्यांच्या मृत्यूचे प्रमाण कमी आहे.


### ५ ते १० एकर:

या गटात १४ टक्के शेतकऱ्यांनी आपली जिवनयात्रा संपवली आहे. या गटातील शेतकरी शेतात विविध कर्ज घेवून भांडवल गुंतवतात व पाऊस पडला नाही तर पर्यायी मार्ग स्विकारतात कर्ज घेतात व त्यापुरते उत्पादन घेवून काही प्रमाणात स्वत:ला सावरतात त्यामुळे हे शेतकरी आत्महत्येकडे कमी वळालेले आहेत.

### १० एकरापेक्षा जास्त:

या गटात फक्त ४ टक्के शेतकऱ्यांनी (४५ शेतकरी ) आत्महत्या केल्या आहेत. कारण खर्च मोठे असल्याने ते सलग दुष्काळ पडला तरी प्रसंगी १ एकर शेत विकून स्वत:ला सावरतील पण घाबरत नाहीत. शेतात पूर्वीची भांडवली गुंतवणूक करुन ते कर्ज परत केलेले असते. त्यामुळे सावकार किंवा बँकाचा तगादा कमी असतो. त्यामुळे हे शेतकरी आत्महत्या कमी करतात. मुळातच जमिनदार, जूने बागायतदार त्यामुळे त्यांना क्षेत्र जास्त असल्याने प्रसंगी एक दोन एकर विकून शांत जीवन जगणारे ही शेतकरी या गटात असू शकतात त्यामुळे या गटातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण अतिशय कमी आहे असे दिसून येते.

आलेख क्रं:१
मराठवाडा प्रदेश
आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची संख्या




**निष्कर्ष :**

सलग तीन ते चार वर्षापासून नापिकी, वाढलेले कर्जाचे व्याज, सरकारचे मदतीचे निरुत्साही धोरण, सावकरांचा तगादा, घरातील शिक्षण, लग्न, आजार अशा न टाळता न येणाऱ्या खर्चात कोणताही बदल होत नाही. त्यातून हा शेतकरी पूढील वर्षी पाऊस येणार नंतर त्यापुढे पिकपाणी येणार पूढील १२ महीने कसे या एका प्रश्नाचे उत्तर त्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते. असे भयावह चित्र मराठवाडयात आहे. २०१५ मध्ये ११०८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यामध्ये ८४ टक्के शेतकरी हे ५ एकरापेक्षा कमी क्षेत्रातील होते. त्यांना या जमिनीतून कुटूंबाची गुजारणा करणे अशक्य होते. तेंव्हा त्यांनी आत्महत्या केल्या तर अनेक शेतकरी स्थलांतरीत झाले. यापैकी ९७ टक्के शेतकऱ्याकडे शेतीशिवाय उत्पन्नाचे  दुसरे साधन नव्हते. आत्महत्या करण्यामध्ये तरुण शेतकऱ्यांचे प्रमाण ३१ टक्के एवढे आहे. मराठवाडयात कापूस, तूर, मूग व ज्वारी ही पिके घेण्याचा कल अधिक आहे. या मधून फार मोठी आर्थिक प्राप्ती होत नसल्याने हे शेतकरी गरीब राहीले व असा दुष्काळ पडल्यास आत्महत्येकडे वळतात.

**संदर्भः**

१. डॉ. सोमनाथ रोडे- मराठवाडयाचा इतिहास
२. ॲग्रोवन वर्तमान पत्र (सकाळ)
३. बळीराजा मासिके २०११
४. वर्तमानपत्र सकाळ व दै. लोकमत २९.०२.२०१६